
राजवाड्यातील
"खजिन्याचा रक्षक"
ज्ञानेश्वर भाऊसाहेब कर्चे

अनुक्रमणिका

Chapter 1 – सुरुवात

ही कथा आहे पेशव्यांच्या काळात तयार झालेल्या राजवाड्याची.कोण म्हणत त्यात गुप्त खजिना आहे ,कोण म्हणत तिथे अतृप्त आत्मे भटकत असतात आणि त्यांच्यासोबत एक भला मोठा नाग त्या खजिन्याचे रक्षण करत असतो. वाड्यात प्रवेश केला की माणूस वेडा होतो,त्याला भूत पछाडत .आता या कथेच्या माध्यमातून हे सर्व खरे आहे का, याचा तपास कसा झाला, ते पाहूया.तर चला कथेला सुरुवात करुया.

थोडस माझ्याबद्दल...

माझे नाव समीर . माझं प्राथमिक शिक्षण गावातच झाले पुढे कॉलेजला शहरात गेलो.आमच्या गावात दोन प्राथमिक शाळा होत्या .एक पाहिली ते चौथी पर्यंत होती आणि ती आमच्या वाडीवर च होती वाडीवरच्या मुलांना जवळच शिक्षण मिळावं म्हणून प्रत्येक वाडीवर एक शाळा उभारण्यात आली होती आणि दुसरी म्हणजे पाहिली ते सातवी पर्यंत होती आणि ती शाळा गावात होती .सर्व मुले चौथी पर्यंत चे शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षणासाठी तिथे जायचे .पण तिथे जायचं माझं मात्र स्वप्न होत. कधी एकदा त्या शाळेत जातोय असं मला वाटत होत.त्याच कारण पुढे समजेलच!

मी लहानपणापासूनच हुशार आणि जिज्ञासू वृत्तीचा होतो.एखादी वस्तू पाहिली की त्यावर माझं संशोधन चालू झालच म्हणून समजा.दिसेल त्याला प्रश्न विचारायचे,हे अस का? हे तसंच का? प्रश्न विचारून विचारून मी सगळ्यांना हैराण करत असायचो.शाळेत पण सगळ्या शिक्षकांचा लाडका विद्यार्थी होतो.शाळेच्या सर्व खोल्यांच्या चाव्या माझ्याकडेच असायच्या. सर रजेवरती असले की मी त्यांची जागा घ्यायचो.सर्व मुलांना दबावात ठेवायचो .दुपारच्या सुट्टीत सगळ्यांना नीट रांगेत उभा राहायला सांगणे ,भात आमटी वाढणे,सर्वांना खावू वाटणे ,ही सगळी जबाबदारी माझ्यावर असायची आणि मी मात्र ही सगळी कामे दुसऱ्याकडून करून घेत असायचो. माझं काम फक्त निरीक्षणं करायचं.ही सगळी कामे आताजरी खालच्या पातळीची वाटत असली तरी पण त्या वेळेस ती कामे करण्यात एक वेगळीच मज्जा होती .

सकाळी उठून स्वच्छ गणवेश परिधान करून शाळेत जायचं म्हणजे मी कधी शाळेत चालत गेलोच नाही मला घ्यायला रोज आमचे सर यायचे ,त्यांच्यासोबतच शाळेत जायचो ,दिवसभर मित्रांसोबत मस्ती करायचो आणि संध्याकाळी परत घरी यायचो.रोज संध्याकाळी घरी आलो की अभ्यास करून आजीच्या मांडीवर जावून बसायचं आजी खूप छान छान गोष्टी सांगायची.पण माझी जिज्ञासू वृत्ती मला शांत बसून देईल तर खर.सारखं सारखं काही न काही प्रश्न विचारत राहायचो.

सव्वीस जानेवारी ला गावातल्या शाळेत एक डान्स स्पर्धा असायची आणि प्रत्येक वाडीवरच्या शाळा आपल्या शाळेचा डान्स प्रदर्शित करण्यासाठी संध्याकाळी गावातल्या शाळेत एकत्र यायच्या .मीही स्पर्धेत भाग घेतला होता. मी माझ्या शाळेच्या डान्स मध्ये एका आदिवासी ढोल वाजवणाऱ्या माणसाचा रोल केला होता. सर्व मुले माझ्या भोवती नाच करत होती आणि मी ढोल वाजवत होतो.

स्पर्धा संपली आणि मी स्टेजच्या पाठीमागे असणाऱ्या वॉश रूमकडे गेलो. वॉश रूमकडे जात असताना मला एक गोष्ट दिसली आणि मी जागच्या जागीच स्तब्ध झालो आणि काही सेकंदात माझी जिज्ञासू वृत्ती जागृत झाली .

मी तिथे पहिल्यांदाच गेलो होतो आणि आपल्या गावात अस काही असेल याचा विचार पण केला न्हवता.

Chapter 2 – रहस्य

मी पुढे जायचा विचार केला .पुढे जावून पाहिलं तर तिथे नो एंट्री चा बोर्ड लावला होता.पण मला काही राहवत नव्हते.मी तसाच पुढे निघालो.तेवढ्यात पाठीमागून आवाज आला.

" समीर कुठे चाललास?"

मी पाठीमागे वळून पहिले तर ते आमचे सर होते .मी नाईलाजाने पाठीमागे फिरलो.आणि सरांजवळ आलो.

"काय कुठे चालला होता?"

"काही नाही सर ते वॉश रूमला गेलो होतो."

"बर बर चल लवकर आणि पुन्हा तिकडे जावू नको."

माझ्या अंगातील प्रश्न विचारायचा किडा लगेच जागा झाला..

"का ओ सर तिकडे का जायचे नाही?"

"तुला सांगितल तेवढं एक ना बाबा कशाला नको त्या उचापती पाहिजेत ."

"ठीक आहे सर नाही जाणार ."

आम्ही स्पर्धेच्या ठिकाणी गेलो .रात्रीचे साधारण अकरा वाजले असतील तोच स्टेज वरून आवाज आला "लवकरात लवकर बक्षीस समारंभाचा कार्यक्रम आटपून घ्यावा .वेळ खूप कमी आहे आपल्याकडे ,बारा वाजायचे आत आपला कार्यक्रम संपला पाहिजे ."

मी विचारात पडलो की बाराच्या आतच का कार्यक्रम आटपून घ्यायचा आणि मी लगेच सरांना प्रश्न विचारला.

"सर आपला कार्यक्रम बाराच्या आतच का संपवायचा?"

सर काही सांगत न्हवते पण मी जरा जास्त जोर लावल्यामुळे सरांनी काहीतरी सांगायचं म्हणून सांगितल.

"बाराच्या पुढे लाईट जाणार आहे त्यामुळे संपवायचा ."

माझ्या बाल मनाने ही त्यावर विश्वास ठेवला.अखेर बक्षीस वितरण झाले. आमच्या शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला होता.एक ट्रॉफी आणि सोबत मानधन ही मिळाले होते.ट्रॉफी सोबत सर्वांनी मिळून फोटो काढले आणि आवराआवर सुरू झाली .

सर्वजण सरांच्या गाडीजवळ आलो आणि गाडीत बसलो.सरही गाडीजवळ आले आणि सगळे आले का याची खात्री करून घेतली.आमचा प्रथम क्रमांक आला नसला तरीही आम्ही खुश होतो .सगळ्यांचा गोंधळ चालु होता .प्रत्येकजण ट्रॉफी घेवून मिरवायचा . बराच वेळ झाला पण गाडी चालू झाली न्हवती .मॅडम सरांना विचारू लागल्या.

"काय झाले सर ?"

"अहो मॅडम गाडीच चालू होईना काय झाले हिला अचानक काय माहित!"

सर खूप वैतागले होते आणि त्याबरोबरच त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट रित्या भीतीही दिसत होती.बराच वेळ प्रयत्न करून पण गाडी काही स्टार्ट होईना.

"मुलांनो नीट लक्ष देऊन एका ."

सगळ्या मुलांनी एकसाथ होकार दिला आणि एकटक त्यांच्याकडे पाहू लागले.

"मी सांगतो तोपर्यंत कोणीही गाडीतून खाली उतरणार नाही किंवा गाडीच्या काचा खाली करणार नाही समजल !"

"हो....."(सर्व मुलांनी एकसाथ होकार दर्शवला)

सर गाडीतून खाली उतरू लागले तोच मॅडम ने आवाज दिला.

"सर कुठे ?"

"जवळच एक मेकॅनिक राहतो त्याला घेवून येतो ."

"पण सर किती वाजलेत पाहिलं का?"

"आय नो मॅडम पण या सर्व मुलांची जबाबदारी माझ्यावर आहे . सो मला हे करावच लागेल.तुम्ही फक्त मुलांना सोडून कुठे जावू नका आणि त्यांनाही कुठे जावू देवू नका .अगदी काही झाले तरीही गाडीतून कोणीही खाली उतरणार नाही .मी आलोच "

असे म्हणून सर निघाले आणि पाहता पाहता नजरेआड झाले .

सरांसारखी मॅडम ची पण अवस्था झाली होती .त्यांच्या चेहऱ्यावर ही भीतीच सावट अगदी स्पष्ट जाणवत होत .पण त्याच घाबरल्या तर या निरागस मुलांचं काय म्हणून त्यांनी स्वतःला धीर दिला.(खरेतर त्यावेळेस त्या सरांना आणि मॅडमला मानावं लागेल स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी मुलांच्या जीवाची पर्वा केली. आधीचे शिक्षक होतेच तशे .शिक्षकाची आणि गावची एक अतूट नाळ जोडलेली असायची.)

थोड्याच वेळात सर एका माणसाला घेवून तिथे आले .तोही खूप घाबरला होता. चारीबजुला नुसता काळाकुट्ट अंधार पडला होता.त्या अंधारात शेजारी कोणी येवून उभा राहिले तरी समजणार नाही असा तो अंधार होता.

"सर पटपट आवरायला सांगा त्यांना .पावणे बारा झालेत ."(मॅडम सरांना बोलत होत्या)

तो माणूस खूप पटापट हात चालवत होता आणि अखेर त्याने झालं म्हणून जाहीर केले.सरांनी त्याचे आभार मानले आणि तो चालत कमी पळतच जाऊ लागला जणू काही त्याच्यामागे कुत्र लागले आहे .आता फक्त बारा वाजायला दोन मिनिट बाकी होते . तोच पहिल्यांदा एक गार वाऱ्याची झुळूक आली त्यासरशी सगळ्यांच्या अंगावर शहारे आले.पण सरांची अवस्था मात्र खूप बिकट झाली होती. त्यांच्या अंगावर आता काटे आले होते.ते आतमध्ये येवून बसले आणि त्याबरोबरच घड्याळात बाराचा टोल पडला .तसे सर आणि मॅडम राम राम म्हणत जप करू लागले आणि त्या गार वाऱ्याच्या लाहरीने आता वादळाचे रुप घेतले व जोरदार वारे वाहू लागले .काही क्षणासाठी अस वाटत होत की या वाऱ्याच्या झोताने आपली गाडी उडून जाते की काय.

सरांनी घाईत गाडीला स्टार्टर मारला आणि आम्ही निघालो .गाडी शाळेच्या आवारातून निघून थोडी पुढे आली आणि मेन चौकातुन गाडीने टर्न घेतला सर अत्यंत वेगात गाडी चालवत होते

.रात्रीची वेळ असल्याने रस्ता एकदम सामसूम होता .सर्व मुलांना व्यवस्थीत पकडून मॅडम बसल्या होत्या आणि सर वेगाने गाडी चालवत होते.पंधरा मिनिटे झाली आम्ही निघून आणि मॅडम च लक्ष बाहेर गेले आणि मॅडम जवळजवळ ओरडल्याच .सर्व मुले मॅडम अशा का ओरडल्या म्हणून त्यांच्याकडे पाहू लागली .मॅडम रडवेल्या स्वरात बोलू लागल्या.

"सर गाडी थांबवा!"

"का मॅडम काय झाले?"

"सर तुम्ही एकदा बाहेर पाहा मग समजेल तुम्हाला."

सरांनी बाहेर नजर टाकली आणि सर हबकलेच.

आम्ही जवळजवळ पंधरा मिनिटे झाली गाडीत होतो आणि गाडी चालत होती.सरांनी बाहेर पाहिले आणि गाडीला जोरदार ब्रेक लावला.तशी सर्व मुले घाबरली आणि बाहेर पाहू लागली.इतक्या वेळ गाडी चालवून पण आम्ही तिथेच होतो.गाडीला जोरदार ब्रेक लावल्यामुळे मॅडमच डोक पुढे आपटल होत आणि त्यातून रक्त ही येत होते.थोड्याच वेळात मॅडम बेशुद्ध झाल्या.सरांना काय करावं काही सुचत न्हवत .सरांनी पुन्हा गाडी चालू केली आणि आम्ही निघालो.पुन्हा आमची गाडी त्याच जागेवर येवून उभी राहिली .आता सर्वांचीच अंग भीतीने थरथर कापत होती.कितीही प्रयत्न केले तरी आम्ही तिथून निघू शकत न्हवतो कारण आम्ही चकव्यात अडकलो होतो.आता बाहेरच वातावरण खूप बदलून गेल होत .सगळीकडे दाट धुके पसरले होते .लोकांचे किंचाळण्याचे आवाज कानावर येत होते,मधूनच ढालीवर तलवार आपटल्याचा आवाज कानावर येत होता,वेगवेगळे आवाज येवू लागल्याने सर्व मुले अजूनच घाबरली होती.

आमच्या पैकी अजून कोणीच घरी न गेल्यामुळे सगळे काळजीत पडले होते.सर्वांना माहित होत की तिथे बाराच्या नंतर कोणीही थांबत नाही आतातर पावणे एक वाजत आला आहे .अजून कोणीच कसे आले नाही म्हणून सगळ्यांचे आईवडील वाडीवरच्या शाळेत येवून वाट पाहत होते.त्यांच्या अनुभवावरून त्यांना समजल की मुले अजून का आली नसतील.सर्व पालक तडक गावच्या शाळेकडे यायला निघाले .सर्वांचे पालक आधी गावच्या पुजाऱ्याकडे गेले आणि त्याला सर्व सांगून आपल्या सोबत घेवून आले .सर अजून पण प्रयत्न करत होते पण सर्व व्यर्थ होत .पुजारी आणि सर्वांचे पालक शाळेजवळ आले त्यांना पुढचं काहीच दिसत नव्हतं.त्या धुक्यामध्ये सर्व काही गडप झाले होते.पुजारी बाबा पुढे झाले आणि बोलू लागले.

"मी सांगतो तोपर्यंत कोणीही एकही पाऊल पुढे टाकणार नाही आणि जर कोणी ही चूक केली तर तोही या मुलांसोबत चकव्यात जाईल."

"ठीक आहे बाबा पण जरा लवकर आटपा मुलांचा जीव धोक्यात आहे."

बाबा एका हातात रुद्राक्षाची माळ आणि दुसऱ्या हातात भस्म घेवून मंत्र उच्चारू लागले.त्यांनी हातातील भस्म सर्वांना लावला आणि कमंडलुतील पवित्र पाणी शिंपडत पुढे पुढे येवू लागले.त्या अदृश्य शक्तीच्या कामात अडथळा आणल्यामुळे त्याने अजून आपली शक्ती वाढवली आणि जोराचा वारा सुटला पण बाबांनी लावलेल्या भस्मामुळे कोणालाही काहीच झाले नाही.हळूहळू वारा शांत झाला ,धुके विरून गेले आणि सर्व वातावरण पूर्ववत झाले .

"इथून पटकन निघून जावा अन्यथा पुन्हा नवीन संकट येण्याची शक्यता आहे."

सरांनी लगेच गाडी चालू केली सर्वजण गाडीत बसले आणि गाडी सरळ वाडिवरच्या शाळेसमोर येवून उभी राहिली.सर्वजण घामाने चिंब झाले होते .मॅडम अजून पण बेशुद्ध होत्या.बाबांनी ते पवित्र पाणी त्यांच्या चेहऱ्यावर मारले आणि त्या शुद्धीत आल्या .

"तुम्हा सर्वांचे दैव बलवत्तर म्हणून तुम्ही सर्वजण वाचलात ."

"तुमचे खूप उपकार झाले बाबा आज तुम्ही नसता तर काय झाले असते ते देवालाच माहित."

"सर्व काही त्या आई तुळजाभवीच्या कृपेने झाले आहे मी तर निम्मित मात्र आहे."

सर्वजण बाबांच्या पाया पडले आणि बाबा निघून गेले.सर पण मॅडमला हॉस्पिटल मध्ये घेवून गेले .मी घरी आलो तेव्हा मला खूप ताप आला होता.माझे सर्व अंग तापाने फणफणत होत .मला जागच उठता ही येत न्हवत .दोन तीन दिवस मी झोपूनच होतो.

हळूहळू मला बर वाटायला लागलं होतं मी शाळेत जावू लागलो पण मला सारखं सारखं तेच आठवत होत .काय होत ते? सर्वजण काय म्हणत होते? चकवा काय ,दैव बलवत्तर काय .मी या आधी हे सगळ कधीच पाहिलं किंवा एकल न्हवत. त्यामुळे मी संभ्रमात पडलो होतो.दोन दिवस शांत झालेली माझी जिज्ञासू वृत्ती पुन्हा जागृत झाली .संध्याकाळी शाळा सुटल्यावर मी सरळ घरी आलो.अभ्यास केला आणि आजीच्या मांडीवर जावून बसलो .आज्जीने बरोबर ओळखलं की मी काहीतरी नवीन प्रश्न घेवून आलो असणार .

"आज काय नवीन प्रश्न पडला आहे आपल्याला !"

"आज्जी त्यादिवशी झालेल काय होत ग?"

"तो चकवा होता ."

"चकवा म्हणजे काय ग?"

"चकवा म्हणजे .....चकवा म्हणजे एक मोठं वादळ आणि त्या वादळाच्या वेगामुळे आपण त्यातून बाहेर पडू शकत नाही "

आज्जीने सांगायचं म्हणून काहीतरी सांगितलं हे मला कळलं होत पण मला खरं तर त्या दिसलेल्या भिंतीबद्दल विचारायचं होत म्हणून मी तो प्रश्न बाजूला केला .

Chapter 3 – खजिना

"आज्जी गावच्या शाळेजवळ ती भिंत कशाची आहे ग ?"

"अरे ती काय फक्त एक भिंत नाही ."

"मग काय आहे ?"

"तो एक राजवाडा आहे ."

"कोणाचा आहे तो वाडा?"

"त्याची एक मोठ्ठी गोष्ट आहे बाळा ."

"सांग ना मग आज्जी ती गोष्ट ."

आणि आज्जी त्या राजवाड्याची गोष्ट सांगू लागली.

"ही गोष्ट खुप वर्षापुर्विची म्हणजे पेशव्यांच्या काळातील आहे.पेशव्यांच्या काळात बांधलेला हा राजवाडा आहे.आपल्या गावात आधी चार भाऊ होते.दोन सख्खे तर दोन सावत्र भाऊ अशे चार भाऊ होते.त्यातला एक भाऊ पेशव्यांच्या दरबारात कामाला असायचा.बाकी तीन मात्र गावातच असायचे.कालांतराने या सख्या आणि सावत्र भावंडांमध्ये जोराची भांडणे झाली.आणि हे बंधू वेगळे झाले.या चार भावांची पुढील पिढी म्हणजे आपल्या गावात ज्या चार वाड्या आहेत ती यांची पिढी.प्रत्येक भावाने आपली स्वतंत्र वस्ती तयार केली आणि वेगवेगळे राहू लागले.सर्वात मोठा भाऊ पेशव्यांच्या दरबारात कामाला असायचा त्यामुळे त्याला कशाची कमी नसायची.

थोरला भाऊ एकदा शेजारच्या राज्यात शिकारीला गेल्यानंतर त्याला एक सुंदर तरुणी दिसली आणि तो त्याच क्षणी तिच्या प्रेमात पडला,काही दिवसांनी त्यांचं लग्न झालं .दिवसामागून दिवस गेले आणि थोरल्या भावाला दोन गोंडस अशी मुले झाली.त्याचा संसार फुलत चालला होता. मुले मोठी होत होती आणि त्यांचा सुखाचा संसार चालला होता.

हळूहळू तो आता पेशव्यांकडून उंटावर पैसे घेवून येवू लागला आणि त्याने या राजवाड्याच्या बांधकामाला सुरुवात केली.तो उंटावरून पैसे घेवून यायचा आणि यिकडे वाड्याचे काम जोरात सुरू झाले होते .तो फक्त वाडा नसून एक गनिमी कावा करण्याचे साधन होते .त्या वाड्यामध्ये खूप साऱ्या गोष्टींचा सामावेश केला होता.भव्य अशे त्याचे दरवाजे ,त्याच्या भिंती ,त्यावरील सुंदर नक्षीकाम, जागोजाग काढली गेलेली चित्रे ,प्रशस्त असा दरबार (हॉल),असंख्य खोल्या,भरजरी रेशमी पडदे ,चंदनाच्या लाकडाचे दरवाजे,वाड्यात खूप साऱ्या सुख सोई उपलब्ध होत्या.

वाडा आतून जेवढा सुंदर आणि मनमोहक होता. तेवढाच दुश्मनासाठी तो घातक होता.वाड्यात जागोजाग छुप्या तलवारी आणि ढाली होत्या. अमाप दारूगोळा होता,विविध प्रकारची शस्त्रे ,अशा एक ना अनेक गोष्टी त्या वाड्यात होत्या .पण त्या सर्व गोष्टी कोणालाच दिसणार नाहीत अशा पद्धतीने त्याला ठेवण्यासाठी वाड्यात जागा बनवल्या होत्या आणि त्या छुप्या जागा फक्त त्या थोरल्या भावाला माहित होत्या.वाडा बाहेरून पहिला तर सहज कोणालाही असेच वाटेल की एखाद्या राजाने त्याच्या राणीसाठी हा महाल बनवला आहे. पण हा महाल नसून दुश्मनासाठी तो त्याचा कर्दनकाळ होता.

वाड्याच्या त्या सुंदर दिसणाऱ्या भिंती फक्त भिंती नसून त्या एक प्रकारच्या सुरंग होत्या.सर्व भिंती आतून पोकळ होत्या आणि त्या पोकळ भिंतीत सुरू झालेली वाट कुठे जाऊन संपते हे मात्र कोणालाच ठाऊक न्हवते . प्रत्येक भिंत आत मधून पोकळ होती आणि त्यात वेगवेगळ्या ठिकाणी पोहचण्यासाठी सुरंग बनवल्या होत्या.राजवाड्यात कधी बाहेरच पाणी आतमध्ये जात नसे .राजवाड्यात अनेक ठिकाणी पाण्याच्या विहिरी खोदल्या होत्या आणि त्याही अदृश्य होत्या .त्याच्याकडे आता अमाप संपत्ती निर्माण झाली होती.मात्र त्याने राजवाड्यात कुठेही खजिन्याच्या साठ्या साठी भांडार बनवले न्हवते .सर्व खजाना त्याने गुप्त ठिकाणी लपवून ठेवला होता .

Chapter 4 – रक्षक

आजी पुन्हा सांगू लागली "थोरल्या भावाची दोन्ही मुले आता मोठी झाली होती आणि त्यांचा सुखाचा संसार चालला होता.पण त्याच्या सुखी संसाराला नजर लागली आणि सगळ काही क्षणात नष्ट झाल.त्याचा सुखी संसार त्याच्या बाकीच्या भावांना बघावला नाही आणि त्यातल्या एका भावाने कट रचला.तो थोरल्या भावाला भेटण्याच्या निमित्ताने वाड्यात शिरला आणि तो आतली संपत्ती पाहून भुलला व त्याला मोह सुटला आणि आपण सर्व विसरून गेलो आहे असा खोटा विश्वास त्याला दाखवला.

त्या भावाच्या मनात आता खूप लालसा निर्माण झाली होती आणि एके दिवशी थोरल्या भावाची पत्नी आणि मुले बाहेरगावी गेल्याची संधी साधून तो रात्रीच्या वेळी राजवाड्यात शिरला . तो राजवाड्यात गेला तसा त्याने पहिला प्रहार त्याच्या भावावर केला .थोरला भाऊ आपला जीव मुठीत घेवून धावू लागला.पण सर्व काही व्यर्थ होते .त्याने हा बेसावध असताना त्याच्यावर तलवारीने सपासप वार केले होते आणि त्याला रक्तबंबाळ करून सोडले होते .हा पुढे धावत होता आणि हा त्याच्यावर तलवारीने पाठीमागून वार करत होता .थोरल्या भावाने कमवलेली संपत्ती आज त्याच्यासाठीच त्याच मरण घेवून आली होती. आपल्याच माणसाने आपला केसाने गळा कापला याची त्याला आता जाणीव झाली.

तो आपला जीव मुठीत घेवून त्याच्या पासून वाचण्यासाठी भिंतीमध्ये बनवलेल्या सुरंग मध्ये शिरला आणि तिथे लपून बसला .या भावाला वाटले की तो मेला म्हणून त्याने त्याच्याकडे लक्ष दिले नाही आणि आता तो राजवाड्यातील खजाना शोधू लागला."

(अंधश्रध्दा पसरवण्याचा आमचा कसलाही हेतू नाही. ही कथा फक्त वाचकांच्या मनोरंजनासाठी आहे .कथेतील पात्र आणि स्थळ हे सर्व काल्पनिक असून त्याचा वास्तव जगाशी कोणताही संबंध नाही आणि असे आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.)

"तिकडे थोरला भाऊ मरणाच्या दारात उभा होता आणि वेदनेने विव्हळत होता.आज त्याचा पैसा ,संपत्ती त्याच्यासाठीच घातक ठरली होती .त्याने विचार पण केला न्हवता की आपलाच भाऊ आपल्यासोबत अस वागेल .तो मात्र आपल्या भावाला मरणाच्या दारात सोडून खजाना शोधण्यात व्यस्त होता.त्याने आता सर्वच्या सर्व वाडा शोधला पण खजाना काही सापडत न्हवता.कारण त्या थोरल्या भावाने तो खजाना अतिशय काळजीपूर्वक लपवून ठेवला होता."

"अचानक पूर्ण वाडा हलू लागला .सर्वांना वाटले की भूकंप आला म्हणून जमीन हलत आहे .खजाना शोधणारा भाऊ आता खूप घाबरला होता .त्याला काहीच समजत न्हवते की असे का होतेय. हळू हळू वाड्याचे दरवाजे बंद झाले . वाड्यातील सगळे दिवे आपोआप विझून गेले.सगळीकडे अंधार दाटून आला आणि अचानक एक जोरदार आवाज झाला.वाड्याची एक भिंत कोसळून पडली .थोरला भाऊ शेवटचे श्वास मोजत होता आणि मरता मरता तो एक शाप देवून गेला ."जो कोणी माझ्या या राजवाड्यात प्रवेश करेल तो जिवानिशी जाईल किंवा तो पूर्ण

वेडा होईल."व त्याच क्षणी त्याचे रूपांतर एका मोठ्या नागामध्ये झाले आणि त्याने त्याच्या भावाला दंश केला व तो जागीच ठार झाला.वाड्याचे सगळे दरवाजे ,खिडक्या पडल्या आणि वाडा एकदम भकास होऊन गेला.तेव्हापासून त्या वाड्यात कोणी प्रवेश करत नाही."

"पुढे काय झालं आज्जी?त्याच्या मुलांचं ,त्याच्या बायकोचं काय झालं?"

"वाड्याची ही वार्ता समजताच त्याच्या बायकोने पण जागीच प्राण त्याग केला .पुढे ही वार्ता पेशव्यांना समजली आणि त्यांनी त्या थोरल्या भावाच्या दोन्ही मुलांना आपल्या दरबारात बोलवून घेतले.त्या दोन मुलांना वेगवेगळे छंद होते.एकाला कुत्रा पाळायचा छंद होता तर दुसऱ्याला कबुतर पाळण्याचा छंद होता.पेशव्यांनी त्यांना शस्त्र साठ्याजवळ नेले आणि ज्याला जे हवे आहे उचलण्यास सांगितले.पेशव्यांना वाटले हे आपल्या बापासारखे शुर असतील आणि ते नक्कीच ढाली व तलवारी उचलतील .पण समोरच दृश्य पाहून ते खूप संतापले.कारण एकाने तिथला कुत्रा उचलून घेतला तर दुसरा मुलगा कबुतर खाण्याजवळ जावून त्यांना दाणे घालू लागला.पेशव्यांनी त्यांना तिथून थोडेफार पैसे आणि दागिने देवून पाठवून दिले.नंतर ते गावात येवून शेतीवाडी करून राहू लागले आणि तो वाडा तेव्हापासून तसाच पडून आहे ."

"खुप दिवसांनी नंतर गावात काही नवीन लोक आले होते आणि त्यातला एक जण चुकून वाड्यामध्ये असणाऱ्या त्या सुरंग मध्ये गेला आणि नंतर कधीच बाहेर नाही आला.त्याला शोधायला गेलेले काही लोक आतमध्ये अडकून पडले तर काही लोक वेडे होऊन बाहेर आले .आजपण ते वेडे झालेले लोक ठीक नाहीत झाले.नंतर सगळ्या गावकऱ्यांनी मिळून तिथे नवीन लोक फसू नयेत म्हणून प्रवेश बंदीची पाटी लावली.त्यानंतर त्या वाड्यामध्ये कोणी प्रवेश तर नाही केला पण जो कोणी रात्री बाराच्या दरम्यान तिथे थांबेल तो त्यांच्या चकव्यात सापडतो.जसे की तुम्ही सापडला होता."

आज्जीची गोष्ट सांगून झाली आणि आम्ही सर्व झोपायला गेलो.माझी आता उत्कंठा शिगेला पोहोचली होती .कधी एकदा त्या शाळेत जातोय अस झाल होत मला.आता शाळेत परीक्षा चालू झाल्या होत्या .परीक्षा संपल्या आणि शाळेला सुट्टी लागली .आता मी पाचवीत जाणार होतो आणि पाचवीच्या वर्गात जाण्यासाठी मला गावातल्या शाळेत जाव लागणार होत कारण वाडीवर फक्त चौथीपर्यंत शाळा होती.आता उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर मी गावातल्या शाळेत म्हणजेच त्या वाड्या जवळच्या शाळेत जाणार होतो .

मी आता पाचवीला गेलो होतो .आज माझा आनंद गगनात मावेनासा झाला होता.एवढ्या दिवस ज्याची वाट पाहिली त्या वाड्याजवळ आज मी शाळेला आलो होतो .नवीन शाळा, नवीन मित्र ,नवीन शिक्षक ,सर्व काही नवीन होते .मला तिथे रुळायला जरासा वेळ गेला.नंतर सर्वांच्या ओळखी झाल्या आणि दिवस खुप आनंदात जाऊ लागले.मित्रांच्या गराड्यात आणि खेळण्याच्या नादात मी तो वाडा पूर्णपणे विसरून गेलो होतो.रोजचा अभ्यास ,दिवसभर खेळ आणि संध्याकाळी आज्जीच्या गोष्टी यातून त्या वाड्याकडे लक्ष द्यायला वेळच भेटत नसे आणि माझ्या बाल मनात थोडीशी भीतीही होतीच त्यामुळे मी तेव्हा जरा त्याच्याकडे दुर्लक्ष केले.असे करत

करत एक वर्ष सरले.

मी सहाविला गेलो आणि आता मात्र त्या वाड्याबद्दल मला जास्त कुतूहल वाटायला लागले.दिवसामागून दिवस जात होते पण मला अभ्यासातून आणि शिक्षकांच्या नजरेतून सुटायचा एकही चान्स मिळत नव्हता.मी एके दिवशी दुपारच्या सुट्टीत त्या वाड्याकडे जायचे ठरवले.मला तो वाडा आतून पाहायचा होता.मी वाड्याकडे जायला निघालो आणि वाड्याच्या दरवाजाजवळ जाऊन उभा राहिलो.काळजात धकधक वाढत होती.मी आत जाणार तोच मला कोणीतरी मागे खेचलं .मी वळून पाहिलं तर तो रमेश होता ,माझा बालमित्र. सतत माझ्या सोबत असायचा."जिवाहून ही प्यारा तूच माझ्या यारा" अगदी असच.मी त्याला सगळ काही सांगितलं आणि तो बोलला की आज अमावस्या आहे .आज नको आत जायला.नंतर कधीतरी जाऊ आणि आम्ही मागे फिरलो .

त्या घटनेला आता पंधरा ते वीस दिवस झाले असतील तोच एक हादरवून टाकणारी घटना घडली.आमच्या शाळेतला एक मुलगा वेडा झाला होता.आमच्याच शाळेतील पण माझ्या पेक्षा मोठा होता तो .त्यांच्या वर्गातील मुले ग्राऊंडवर क्रिकेट खेळत होती आणि खेळता खेळता बॉल त्या वाड्यामध्ये गेला .तो बॉल आणण्यासाठी त्या वाड्यामध्ये गेला आणि बाहेर तर आला पण पूर्ण वेडा होऊन.तो वेडा तर होता पण त्याच्यात एक शक्ती संचारली होती .तो कितीही जड समान असले तरी तो एका हातात उचलून फेकून देत असे.खूप दूरपर्यंत त्याची नजर जायची.त्याच्याबद्दल कोणी कितीही हळू आवाजात बोलले तरी त्याला ते एकायला जात असे आणि दुसऱ्याचं क्षणी तो त्या व्यक्तीवर हल्ला करत असे .या भीतीमुळे गावातील लोक आता त्याच्याबद्दल काही बोलत नसायचे .त्याला एका शूरवीर क्षत्रीयासारखी शक्ती मिळाली होती.त्याची नजर ,त्याचे कान आणि त्याची ताकद सर्व काही सैनिकासारख होत.खूप काही प्रयत्न केले पण त्याला नीट करणे अशक्य होते.

मी पण त्या घटनेमुळे खूप घाबरलो होतो आणि काही दिवस आता त्याच्याकडे अजिबात फिरकायच नाही अस ठरवल .

राजवाड्यात आता दिवसेंदिवस वाईट घटनांचे प्रमाण अधिक वाढत चालले होते आणि त्याचे वाईट परिणाम सर्वत्र दिसत होते.त्यामुळे माझ्या बाबांनी मला त्या शाळेतून काढून बाहेरगावी शाळेसाठी पाठवले.

मी त्या शाळेतून दुसऱ्या शाळेत गेलो आणि तो वाडा पूर्णपणे विसरून गेलो.बाहेरगावी शाळेत गेलो तरीपण कधीकधी त्या वाड्याची आठवण येत असायची.पण मी या वाड्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत होतो.ज्या वाड्या बद्दल येवढे दिवस कुतूहल वाटत होते त्याच वाड्याला आता मी घाबरत होतो.आता माझं प्राथमिक शिक्षण पूर्ण झालं होत आणि मी कॉलेज मध्ये जात होतो.कॉलेजे मध्ये मी एकदा एक प्रोजेक्ट केला होता आणि त्यात या जगात भूत वगैरे काही नाही हे सिद्ध करायचं होत.ज्यांना ज्यांना अशे अनुभव आले आहेत.त्यांना नक्की तिथे काय घडले हे विचारून त्याचे शास्त्रीय पद्धतीने निवारण करायचे आणि त्यात मी यशस्वी झालो होतो.

आता माझं कॉलेज संपवून मी जॉब साठी पुण्याला जाणार होतो आणि त्यामुळे कामावर रुजू व्हायच्या आधी एकदा गावाकडे जाऊन यावं म्हणत होतो .मी गावाकडे गेलो आणि त्या सगळ्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या.

मी काही दिवस आराम केला आणि माझ्या मित्राला भेटायला गेलो.त्याने तिथे गेल्या गेल्या त्या वाड्याचा विषय काढला .मी पण कॉलेज मध्ये केलेल्या प्रोजेक्ट मुले माझीही भीती कमी झाली होती.म्हणूनच आम्ही त्या वाड्यामध्ये जाण्याचा पुन्हा एकदा नव्याने प्लॅन बनवला होता.आम्ही सर्व प्लॅन बनवला आणि वाड्यामध्ये जाण्याचा दिवस ठरवला.

पौर्णिमेची रात्र सर्वत्र लख्ख असा चंद्राचा प्रकाश पडला होता.रातकिडे किर्र किर्र करून ती नीरव शांतता भंग करत होते.मध्येच कुठेतरी टिटवी कर्कश असा आवाज करून पुन्हा शांत होत होती.आम्ही वाड्याच्या मुख्य दरवाजाजवळ आलो.मी माझ्या मित्राच्या हाताला पकडलं आणि आतमध्ये जाण्यासाठी निघालो पण त्याने हात सोडवत आधी तू आत जा काही झाले तर बाहेर कोणी तरी हवं म्हणून मी इथेच थांबतो अस मला सांगितल .मी पण एकटा जाण्यासाठी तयार झालो.

मी वाड्यामध्ये प्रवेश केला आणि सर्वत्र नजर फिरवली .तिथे जे पाहिलं ते पाहून माझ्या पायाखालची जमीनच सरकली.खरे तर तो वाडा येवढ्या दिवस बंद होता की आतापर्यंत त्या वाड्यामध्ये खूप कचरा ,कोळ्याची जाळे असायला हवे होते .पण प्रत्यक्षात तिथे तर काहीच न्हवते .पूर्ण वाडा लख्ख प्रकाशाने उजळून निघाला होता.प्रत्येक खांबावर एक मशाल जळत होती आणि त्यातून त्या आग ओकनाऱ्या ज्वाळा बाहेर पडत होत्या.आज्जीने जस त्या वाड्याचे वर्णन केले होते अगदी तसाच तो वाडा होता.कुठेच त्याला काहीच झाले न्हवते .मी विचारात पडलो .इथे काय होत आहे हे अजिबात समजत नव्हत. मी पुढे पुढे सरकत होतो आणि मी वाड्याचा दरबार जिथे भरतो तिथे गेलो .समोरच दृश्य काळजाचा ठोका चुकवणारे होते.मला दरारून घाम फुटला आणि श्वासाची गती वाढू लागली होती.

समोरच्या त्या भव्य खुर्चीत एक माणूस बसला होता.बहुतेक तोच तो थोरला भाऊ असावा.पिळदार शरीरयष्टी , मिशांना ताव मारून बरोबर त्यांचे आकडे केलेले ,डोक्यावरती पगडी आणि कंबरेला तलवार.त्याच्या शेजारी अनेक लोक बसले होते आणि त्यामध्ये सर्वात विदारक वास्तव हे होत की त्या सर्वांमध्ये माझा मित्र ही बसला होता.जो काही क्षणापूर्वी माझ्यासोबत वाड्याच्या मुख्य दरवाजाजवळ आला होता. आतमध्ये तर मी एकटा आलो होतो पण तो माझ्याआधी त्यांच्या बैठकीत येवून बसला होता .हे सर्व काय चाललय हेच कळत नव्हते आणि अचानक ते सर्व गायब झाले.

मी आता खूप घाबरलो होतो.माझ्या सर्वांगावर घामाच्या धारा वाहू लागल्या होत्या.येवढ्या वेळ तो सुंदर दिसणारा नजारा आता पूर्ण बदलून गेला होता.सर्वत्र कोळ्याने जाळे विणले होते .जागोजाग वटवाघळी उलट्या लटकल्या होत्या.मघाशी तर सगळीकडे चंद्राचा प्रकाश पडला होता आणि आता तर सर्वत्र काळाकुट्ट अंधार पसरला होता.बाहेर जोरजोरात कुत्रे ओरडुन रडत होते आणि त्यांना टिटवी साथ देत होती.पूर्ण वाड्यामध्ये खूप भयानक अस चित्र उमटले होते.मी जिवाच्या आकांताने ओरडत होतो पण माझ्या तोंडून एकही शब्द बाहेर पडत न्हवता. सर्व जण माझ्या पाठी लागले होते.मी जिवाच्या आकांताने ओरडन्याचा केविलवाणा प्रयत्न करत होतो आणि धावत होतो.

धावत धावत मी त्या भिंतीमधील सुरंग मध्ये पोहचलो आणि एका दगडाला धडकून खाली पडलो.अचानक त्या दगडातून एक राक्षसी आकृती बाहेर पडली

तिचे डोळे लाल भडक होते ,चेहरा होता पण नाक न्हवते फक्त तोंड आणि लांब सुळ्यासारखे दात .ती अमानवीय आकृती हळू हळू माझ्याकडे चाल करून येत होती आणि विद्रूप अशी हास्य करत होती. ती अमानवीय आकृती एकदम माझ्या जवळ आली आणि माझ्यावर जोरदार वार केला .मी तो वार चुकवला आणि बाहेर पळू लागलो.दरवाज्याजवळ आलो तसा माझ्या डोक्यात कोणीतरी वार केला आणि मी बेशुद्ध होऊन खाली पडलो.

मला शुद्ध आली तेव्हा मी तिथेच दरवाज्याजवळ पडलो होतो. वातावरण पूर्णपणे शांत झाले होते .पूर्वेला सूर्य वरती येवू लागला होता.मी पूर्ण भानावर आलो आणि सरळ घराच्या दिशेने धूम ठोकली.घराजवळ पोहचलो तेव्हा अंगणात सगळे गावकरी जमा झाले होते आणि बायकांचा मोठमोठ्याने रडण्याचा आवाज येत होता.मी पुढे होऊन पाहिले आणि माझी पावले जागीच थांबली.

मी खाली बसलो आणि समोरच दृश्य पाहत होतो .समोर माझा मृतदेह होता .सर्वजण माझ्या चारी बाजूने बसले होते .मी त्या अमानवीय आकृतीचा वार चुकवण्यासाठी केलेली धडपड व्यर्थ ठरली होती.

मला काही समजण्याच्या आत एका अमानवीय आकृतिने माझ्या दंडाला पकडलं आणि काही क्षणात मी राजवाड्याच्या दरबारात पोहचलो होतो . माझं तिथे राजवाड्यातील खजिन्याचा एक नवा रक्षक म्हणून स्वागत करत होते आणि आजपासून मी सुद्धा राजवाड्यातील खजिन्याचा एक नवा रक्षक झालो होतो.

समाप्त.